# पंचगंगेचा पूरधोका नकाशांद्वारे मांडणारे ठरले मॅपाथोन चॅम्पियन

## प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार यांचा सन्मान

कोल्हापूर, ता. १८ : भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (आयआयटी-बी), भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) व ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय संस्थांतर्फे आयोजित 'मॅपाथोन' स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातील प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार, तसेच रत्नागिरी जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांना मॅपाथोन चँपियन अॅवॉर्डने सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचा निकाल फेब्रुवारीमध्ये जाहीर झाला. स्पर्धेसाठी देशभरातून वेगवेगळ्या संस्थांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. स्पर्धेसाठी ५२२८ जणांनी नोंदणी केली होती. यातून २५ जणांची राष्ट्रीय मॅपाथोन चँपियन म्हणून निवड करण्यात आली.

पान ११ वर »



कोल्हापूर : 'मॅपाथोन चॅम्पियन' अॅवॉर्डने सन्मानित झालेले प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर व अभिजित पाटील यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

### अशी होती स्पर्धा आणि उद्दिष्टे

मॅपाथोन विशिष्ट स्थानबद्ध समस्येवर उपाय योजनेसाठी घेण्यात आलेली राष्ट्रीय स्तरावरील मॅपिंग स्पर्धा होती. भारतीय अवकाश संशोधन संस्थेने संशोधनासाठी भारतीय उपग्रहांनी घेतलेली माहिती, भुवन, एनआरएससी प्लॅटफॉर्मवरून उपलब्ध करून दिली होती. माहितीत भारतीय संसाधने, शेती, हवामान, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामीण व शहरी नियोजन आणि भविष्यातील विकासाचे मार्ग ओळखण्याची प्रचंड क्षमता आहे. आत्मनिर्भर भारत राष्ट्रीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्पर्धेसाठी फक्त भारतीय उपग्रहीय व अनुषंगिक माहितीचा वापर करणे अनिवार्य होते. भारतीय रिमोट सेन्सिंग डेटाची क्षमता समजून घेणे आणि ओपन सोर्स सॉफ्टवेअरचा वापर करून भारतीय विभागांसाठी अत्याधुनिक नकाशे तयार करणे, हेच स्पर्धेचे मुख्य उदिष्ट होते.

# पंचगंगेचा पूरधोका नकाशांद्वारे मांडणारे ठरले मॅपाथोन चॅम्पियन

» पान १ वरून

स्पर्धेसाठी डॉ. पन्हाळकर व त्यांच्या पथकाने 'फ्लड रिस्क असेसमेंट ऑफ पंचगंगा रिव्हर आणि लॅंडसाईड रिस्क असेसमेंट ऑफ एसडब्ल्यू महाराष्ट्र' असे विषय निवडले होते. यातून त्यांनी कोल्हापूर व परिसरातील स्थानिक भौगोलिक समस्या नकाशांमधून सादर केल्या. कोल्हापूरजवळून वाहणाऱ्या पंचगंगा नदीला येणाऱ्या पुराचा रिस्क झोन नकाशा उपग्रहीय माहिती व जीआयएस सॉफ्टवेअरचा वापर करून तयार केला. कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यादरम्यान असणाऱ्या पश्चिम घाटातील रस्त्यांवर होणारे भूस्खलनही नकाशांद्वारे डॉ. पन्हाळकर आणि त्यांच्या पथकाने सादर केले. या नकाशांसाठी प्रथमच भूगोल अधिविभागाने बारकोड प्रणालीचा उत्तम प्रकारे वापर केला. नकाशावरील बारकोड स्कॅन करताच मॅपमधील माहिती मोबाइलमध्ये असणाऱ्या गुगलमॅपवर दिसेल, अशाप्रकारचे तंत्रज्ञान नकाशामधून सादर केले आहे. याचा वापर या भागातील लोकवस्ती व प्रशासकीय अधिकारी यांना आपत्ती व्यवस्थापनासाठी होऊ शकतो. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी या यशाबद्दल डॉ. पन्हाळकर, अभिजित पाटील, सुधीर पोवार व संजय शिंदे यांचा सत्कार केला.

18 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाची कार्यशैली वाखाणण्याजोगी

## प्रा. जे. पी. शर्मा; नॅक पुनर्मूल्यांकनाची चौथी फेरी पूर्ण; गोपनीय अहवाल कुलगुरूंकडे

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांची कार्यशैली, उत्साह आणि निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. याच पद्धतीने विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने कार्यरत राहावे, असे आवाहन नॅक पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांनी आज येथे केले. विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनासाठी गेले तीन दिवस डॉ. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती विद्यापीठात दाखल झाली होती. या प्रक्रियेची सांगता आज सायंकाळी 'एक्झिट मीटिंग'ने झाली. त्या बैठकीत ते बोलत होते.

प्रा. शर्मा म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाची पाहणी हा आम्हा समिती सदस्यांकरिताही उत्तम व अनेक नवीन गोष्टी सांगणारा अनुभव राहिला. तीन दिवसांत येथील सर्वच घटकांमध्ये एक अनोखा उत्साह आणि सिद्धहस्त काम करण्याची ऊर्जा सर्वत्र जाणवत राहिली. ही बाब फार महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम तर अतिशय उल्लेखनीय होता. याच एकात्मतेने आपण शिवाजी विद्यापीठाला उंचीवर घेऊन जाल, असा विश्वास वाटतो. विद्यापीठामध्ये आल्यापासून कोल्हापुरी आतिथ्यशीलतेचा अतिशय उत्तम अनुभव आहे."

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, "विविध अधिविभागांना भेटी देऊन पाहणी करताना तसेच विविध घटकांशी संवाद साधताना समिती सदस्यांनी अत्यंत मोकळेपणाने मौलिक सूचनाही केल्या. त्या सूचनांचा विद्यापीठ निश्चितपणाने पाठपुरावा करून अमलात आणेल. 'नॅक' मूल्यांकनाची ही फेरी यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा यांसह सर्वच अधिकार मंडळांचे सदस्य या सर्वांनी प्रयत्न केले."

प्रा. शर्मा यांनी 'नॅक'ला सादर करण्यात येणाऱ्या गोपनीय अहवालाची एक प्रत कुलगुरू डॉ. शिर्के यांना सादर केली. हा अहवाल समितीतर्फे 'नॅक' बंगळूरु यांना सादर करण्यात येणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह नॅक पिअर समितीचे सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एम. ए. एच. मोईनुद्दीन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनीलकुमार व प्रा. हरीश चंद्रा दास उपस्थित होते.




कोल्हापूर : नॅक समितीचा गोपनीय अहवाल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना नॅक समितीचे अध्यक्ष डॉ. जे. पी. शर्मा सोबत (डावीकडून) डॉ. आर. के. कामत, नॅक समिती सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. हरिशचंद्रा दास, प्रा. सुनीलकुमार, प्रा. तरुण अरोरा, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, प्रा. एम. ए. एच. मोईनुद्दीन, डॉ. एम. एस. देशमुख आदी.

18 MAR 2021

**लोकमत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाचा गोपनीय अहवाल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे नॅक पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांनी सुपूर्द केले. यावेळी डावीकडून आर. के. कामत, बी. आर. कौशल, हरिश चंद्रा दास, सुनील कुमार, तरुण अरोरा, पी. एस. पाटील, एस. ए. एच. मोईनुद्दीन, आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीसाठी एकदिलाने कार्यरत राहा : जे. पी. शर्मा

## 'नॅक' मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण : समितीकडून गोपनीय अहवाल सुपूर्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची पाहणी हा आम्हा समिती सदस्यांसाठीच एक उत्तम आणि अनेक नवीन गोष्टी सांगणारा अनुभव राहिला. विद्यापीठातील सर्वच घटकांची कार्यशैली, उत्साह, निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. त्याच पद्धतीने विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने कार्यरत राहावे, असे आवाहन 'नॅक' पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. जे. पी. शर्मा यांनी बुधवारी केले.

### प्राध्यापकांच्या रिक्त जागांची पूर्तता करा

संशोधन, शिक्षण, आदी क्षेत्रातील विद्यापीठाची वाटचाल चांगली आहे. प्राध्यापकांच्या रिक्त जागांमुळे अध्यापनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे विद्यापीठाने या रिक्त जागा भरण्याबाबतची पूर्तता करावी, अशी सूचना प्रा. शर्मा यांनी केली. द त्यांनी कुलगुरूंकडे सुपूर्द केलेला गोपनीय अहवाल मूल्यांकन आणि काही सुधारणाबाबतच्या सूचना अशा दोन विभागांमध्ये आहे. हा अहवाल 'नॅक'कडून मूल्यांकन जाहीर झाल्यानंतर विद्यापीठाकडून पाहण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रिये समारोपाप्रसंगी झालेल्या 'एक्झिट मीटिंग'मध्ये ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह समिती सदस्य प्रमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAR 2021
पुढारी




कोल्हापूर : 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाचा गोपनीय अहवाल प्रा. जे. पी. शर्मा यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी उपस्थित डॉ. आर. के. कामत, प्रा. बी. आर. कौशल, प्रा. हरिश चंद्रा दास, आदी.

# 'नॅक' पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीचे काम पूर्ण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांची कार्यशैली, उत्साह आणि निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. याच पद्धतीने सर्वांनी एकदिलाने कार्यरत राहावे, असे आवाहन 'नॅक' पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांनी बुधवारी केले.

विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाचे काम गेले तीन दिवस डॉ. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समितीकडून सुरू होते. त्याची सांगता बुधवारी 'एक्झिट मिटिंग'ने झाली. यावेळी प्रा. शर्मा यांनी 'नॅक'ला सादर करण्यात येणाऱ्या गोपनीय अहवालाची एक प्रत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना सादर केली.

प्रा. शर्मा म्हणाले, विद्यापीठाची पाहणी समिती सदस्यांसाठी उत्तम व अनेक नवीन गोष्टी सांगणारा अनुभव राहिला. येथील सर्वच घटकांत उत्साह आणि मिळून काम करण्याची ऊर्जा जाणवली. विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम उल्लेखनीय होता. याच एकात्मतेने विद्यापीठाला उंचीवर घेऊन जाल, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून विद्यापीठात आपल्याला कोल्हापुरी आतिथ्यशीलतेचा उत्तम अनुभव आला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोरोना महामारीचे सावट असतानाही समितीचे सर्वच सदस्य देशाच्या कानाकोपऱ्यातून आले. अधिविभागांची पाहणी करताना, विविध घटकांशी संवाद साधताना त्यांनी मौलिक सूचना केल्या. त्या अमलात आणल्या जातील. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी आभार मानले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह नॅक पिअर समितीचे सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच. मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार व प्रा. हरिश चंद्रा दास उपस्थित होते.

18 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वच घटकांची कार्यशैली, निष्ठा वाखाणण्याजोगी

## प्रा. जे. पी. शर्मा : शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक' पुनर्मूल्यांकन चौथ्या फेरीचे काम पूर्ण

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांची कार्यशैली, उत्साह आणि निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. याच पद्धतीने विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने कार्यरत राहावे, असे आवाहन 'नॅक' पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनासाठी सोमवारपासून डॉ. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती विद्यापीठात दाखल झाली होती. या प्रक्रियेची सांगता बुधवारी औपचारिक 'एक्झिट मीटिंग'ने झाली. या बैठकीत ते बोलत होते.



कोल्हापूर : 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाचा गोपनीय अहवाल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना प्रा. जे. पी. शर्मा. सोबत डॉ. आर. के. कामत, प्रा. बी. आर. कौशल, प्रा. हरिशचंद्र दास आदी.

प्रा. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची पाहणी हा आम्हा समिती सदस्यांसाठीच एक उत्तम व अनेक नवीन गोष्टी सांगणारा अनुभव राहिला. गेल्या तीन दिवसांत येथील सर्वच घटकांमध्ये एक अनोखा उत्साह आणि मिळून काम करण्याची ऊर्जा सर्वत्र जाणवत राहिली, ही बाब फार महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम उल्लेखनीय होता. याच एकात्मतेने आपण शिवाजी विद्यापीठाला उंचीवर घेऊन जाल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विद्यापीठामध्ये आपल्याला कोल्हापुरी आतिथ्यशीलतेचा अतिशय उत्तम अनुभव आल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. शर्मा यांनी 'नॅक'ला सादर करण्यात येणाऱ्या गोपनीय अहवालाची एक प्रत कुलगुरू डॉ. शिर्के यांना सादर केली. हा अहवाल समितीतर्फे 'नॅक' बंगळुरू यांना सादर करण्यात येणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह नॅक पिअर समितीचे सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एम. ए. एस. मोईनुद्दीन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार व प्रा. हरिश चंद्र दास उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोविड-१९ च्या महामारीचे सावट असतानाही समितीचे सर्व सदस्य देशाच्या कानाकोपऱ्यातून कोल्हापूर येथे दाखल झाले, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. विविध अधिविभागांना भेटी देऊन पाहणी करताना तसेच विविध घटकांशी संवाद साधताना समितीच्या सदस्यांनी मनमोकळेपणाने मौलिक सूचनाही केल्या. या सूचनांचा विद्यापीठ निश्चितपणाने पाठपुरावा करून अंमलात आणेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. 'नॅक' मूल्यांकनाची ही फेरी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे विभागप्रमुख, शिक्षक, सहाय्यक, विद्यार्थी, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा यासह सर्व अधिकार मंडळांचे सदस्य या सर्वांना कुलगुरूंनी धन्यवाद दिले.

1 8 MAR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक घटकाची विद्यापीठाशी एकनिष्ठता वाखाणण्यासारखी

## नॅक पिअर कमिटीचे चेअरमन प्रा. जे. पी. शर्मा : 'नॅक' पुनर्मूल्यांकनाच्या चौथ्या फेरीचे काम पूर्ण




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनाचा अहवाल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना नॅक पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा, सोबत डॉ. आर. के. कामत, प्रा. कौशल, प्रा. हरिश चंद्रा दास, प्रा. सुनील कुमार, प्रा. अरोरा, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. मोईनुद्दीन, डॉ. देशमुख.

प्रतिनिधी
कोल्हापूर

गेल्या तीन दिवसात येथील सर्वच घटकांमध्ये एक अनोखा उत्साह आणि मिळून काम करण्याची ऊर्जा सर्वत्र जाणवत राहिली. ही बाब फार महत्त्वाची आहे. याच पद्धतीने विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने कार्यरत रहावे. शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांची कार्यशैली, उत्साह आणि निष्ठा वाखाणण्याजोगी आहे, असे प्रतिपादन 'नॅक' पिअर समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनासाठी गेले तीन दिवस डॉ. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय समिती विद्यापीठात दाखल झाली होती. या प्रक्रियेची सांगता बुधवारी झाली. यावेळी आयोजित बैठकीत डॉ. शर्मा बोलत होते.

प्रा. शर्मा म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची पाहणी हा आम्हा समिती सदस्यांसाठीच एक उत्तम व अनेक नवीन गोष्टींची माहिती देणारा अनुभव राहिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेला सांस्कृतिक कार्यक्रम तर अतिशय उल्लेखनीय होता. याच एकात्मतेने आपण शिवाजी विद्यापीठाला उंचीवर घेऊन जाल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठामध्ये आपल्याला कोल्हापुरी आतिथ्यशीलतेचा अतिशय उत्तम अनुभव आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोविड-१९च्या महामारीचे सावट सर्वत्र असतानाही समितीचे सर्वच सदस्य देशाच्या कानाकोपऱ्यातून कोल्हापूर येथे दाखल झाले, याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. विविध अधिविभागांना भेटी देऊन पाहणी करताना तसेच विविध घटकांशी संवाद साधताना समिती सदस्यांनी मनमोकळेपणाने मौलिक सूचनाही केल्या. त्या सूचनांचा विद्यापीठ निश्चितपणाने पाठपुरावा करून अंमलात आणेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

'नॅक' मूल्यांकनाची ही फेरी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे विद्यापीठातील विविध विभागप्रमुख, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा यांच्यासह सर्वच अधिकार मंडळांनी सहकार्य केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, नॅक

### विद्यापीठ मूल्यांकनाचा अहवाल नॅक बेंगळूरला सादर करणार

प्रा. शर्मा यांनी 'नॅक'ला सादर करण्यात येणाऱ्या अहवालाची एक प्रत कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सादर केली. हा अहवाल नॅक पिअर समितीतर्फे 'नॅक' बेंगळूरू यांना सादर करण्यात येणार आहे.

पिअर समितीचे सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच. मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार व प्रा. हरिश चंद्रा दास उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAR 2021
पुण्यनगरी

# स्वातंत्र्याचे स्वैराचारमध्ये रूपांतर नको : अर्जुन चव्हाण

गडहिंग्लज : प्रतिनिधी

आज सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसतात. त्याच पद्धतीने त्या साहित्य लेखनामध्येही दिसतात. आज संविधानाने स्त्रियांना समानतेचा अधिकार दिला आहे, स्वातंत्र्य दिले आहे; परंतु आजही मानसिकता बदलली नाही. सर्वांनी त्या स्वातंत्र्याचे स्वैराचारमध्ये रूपांतर होणार नाही याचीही दक्षता घ्यावी, असे मत शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी व्यक्त केले.

येथील ओंकार महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय वेबिनार उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर होते. प्र. प्राचार्य सुरेश चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. देव विश्व विद्यालय अमृतसर येथील डॉ. सुनीता शर्मा व कालिकत विश्व विद्यालय केरळ येथील डॉ. व्ही. के. सुब्रमण्यम यांनी 'हिंदी साहित्यामधील लिंगभेद समानता' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर डॉ. घाळी कॉलेजचे प्रा. अनिल उंदरे यांनी, राजा शिवछत्रपती महाविद्यालयातील डॉ. रचना मुसाई यांनी 'इंग्रजी साहित्य व स्त्री-पुरुष समानता' याबाबत मत स्पष्ट केले, तर डॉ. संत झेवियर महाविद्यालय म्हापसा गोवा येथील डॉ. गीता येर्लेकर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर येथील डॉ. सर्जेराव जाधव यांनी 'मराठी साहित्य व स्त्री-पुरुष समानता' याबाबत मार्गदर्शन केले. संजीवनी पाटील यांनी प्रास्ताविक केले. स्वयंप्रभा सरमगदूम, शर्मिला घाटगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्नेहल ताडे, गजानन कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. बसवराज मगदूम यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 MAR 2021
लोकसत्ता

# राज्यातील सर्व विद्यापीठांत दूरस्थ शिक्षण प्रणालीसाठी आग्रही – सामंत

**मुंबई :** मुंबई विद्यापीठात राबविली जाणारी दूरस्थ शिक्षण पद्धती राज्यातील १३ विद्यापीठांमध्ये सुरू करण्यासाठी आपण आग्रही असल्याचे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित पदवी वितरण समारंभात सामंत बोलत होते. यंदा मुंबई विद्यापीठातील दूरस्थ शिक्षणाच्या माध्यमातून १८ हजार ३२१ विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली. या कार्यक्रमात विविध शिक्षणक्रमातील १५ गुणवंत विद्यार्थ्यांना पदवी देण्यात आली. यावेळी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रविंद्र कुलकर्णी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.